कोरोना उपचाराकरिता आवश्यक असलेली साधने व साहित्याच्या खरेदीची उपाययोजनेची जबाबदारी पार पाडण्यासाठी समन्वय अधिका-याची नियुक्ती करणेबाबत

महाराष्ट्र शासन
वैदयकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग
क्र.एफडीएस-२०२०/प्र.क्र..४७/२०/औषधे-१
मंत्रालय,गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकूल इमारत ,
लोकमान्य टिळक मार्ग ,मुंबई ४०० ००१,
दिनांक :- २४ मार्च, २०२०

प्रस्तावना -

राज्यात कोरोना व्हायरसचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाकडून विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. कोरोना उपचाराकरिता आवश्यक असलेली विविध साधने व साहित्य यांचे विनिदेश निश्चित करणे व खरेदीची उपाययोजना करणे याबाबतची जबाबदारी पार पाडण्यासाठी सगान्वय अधिकारी नियुक्त करण्याच्या अनुषंगाने शासन पुढील प्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय-

राज्यात कोरोना व्हायरसचा प्रादुर्भाव रोखणे व या संदर्भात उपाययोजना करण्यासाठी मंत्रालयात स्वतंत्रपणे कोरोना नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. सदरहू आपत्कालीन परिस्थितीत शासनाकडून विविध उपाययोजना करण्यात येत आहेत.

३. यानुषंगाने, कोरोना उपचाराकरिता आवश्यक असलेली विविध साधने व साहित्य यांचे विनिदेश निश्चित करणे व खरेदीची उपाययोजना करणे याबाबतची जबाबदारी पार पाडण्यासाठी व्यवस्थापकीय संचालक, हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळ, मुंबई यांची समन्वय अधिकारी ( Nodal Officer ) म्हणून याव्दारे नियुक्ती करण्यात येत आहे.

४. व्यवस्थापकीय संचालक, हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळ, मुंबई हे जिल्हास्तरीय खरेदीचे तसेच C.S.R. ( Civil Social Responsibility ) फंडातुन करण्यात येणा-या खरेदीचे समन्वयन करतील

५. व्यवस्थापकीय संचालक, जीव औषध निर्माण महामंडळ मुंबई यांनी त्यांना सदर शासन निर्णयान्वये सोपविण्यात आलेल्या जबाबदारीच्या अनुषंगाने पार पाडलेल्या बाबींचा अहवाल दररोज मा. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांना सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( शिवाजी पाटणकर)
सह सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. मा. मुख्यसचिव यांचे उपसचिव , मंत्रालय, मुंबई

२. व्यवस्थापकीय संचालक, हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळ मुंबई

३. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग यांचे स्वीय सहायक

४. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई

Scanned by CamScanner

५. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, संचालनालय,मुंबई

६. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई

Scanned by CamScanner